**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे कार्यालयातील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सहाय्यक लेखाअधिकारी यांच्या बदलीबाबत.**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, ३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.

आदेश क्र. संलेको-०१-२०१९/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/नस्ती क्र.112/मध्य.बदली/कृष्णा-खोरे/ 77
दिनांक : 27 JAN 2019

संदर्भ:-

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनीयमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ कलम ६ (ख) व परंतुक.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१३१/कोषा.प्रशा.३, दि.३०.०५.२०१५.
३. वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र २०१७/प्र.क्र.१७/कोषा (प्रशा ३), दि.२७.०३.२०१७.
४. जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. आढावा-२०१८/प्र.क्र.४५/२०१८/आस्था.(पुनर्रचना), दि.१०.०१.२०१९.

************************************************************

## : आदेश :

जलसंपदा विभागाच्या दि.१०.०१.२०१९ रोजीच्या संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत असलेल्या सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील १० पदांपैकी ७ पदे खालील कार्यालयांना जलसंपदा विभाग शासन निर्णय दि.१५.१०.१९९२ प्रमाणे आस्थापना फिरवाफिरवीने वर्ग करण्यास असलेल्या अधिकारानुसार उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

१. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद -३ पदे.
२. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ , ठाणे. -२ पदे.
३. तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव - २ पदे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे या कार्यालयात सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील ७ अधिकारी कार्यरत आहेत. जलसंपदा विभागाच्या उपरोक्त शासन निर्णय दि.१०.०१.२०१९ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे कार्यालयात नवीन आकृतीबंधनुसार १० ऐवजी ३ सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांचे पद मंजुर झाली असल्याने ४ सहाय्यक लेखा अधिकारी या कार्यालयात अतिरिक्त ठरत असल्याने त्यांना बदलीने पुणे जिल्ह्यात बदलीने इतरत्र पदस्थापना देणे आवश्यक ठरते.

यास्त्व वर नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त ठरत असलेल्या ४ सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनीयमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार व संदर्भ क्र.२ व ३ मधील शासन निर्णयाान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील विवरणपत्रात त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत आहे.

(कृ.मा.प...)





Scanned by CamScanner

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व कार्यालय | बदली करण्यात येत असलेले पद कार्यालय व ठिकाण | स्तंभ क्र.३ मधील उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती चारूशिला श्रीनिवास सावणे, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. | सहाय्यक लेखा अधिकारी, सहाय्यक संचालक, सांस्कृतिक संचालनालय, पुणे विभाग, पुणे. | श्रीमती कांचन रा. डिके, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या दि.३१.०५.२०१८ रोजीच्या प्रशासकीय बदली आदेशान्वये रिक्त. |
| २ | श्रीमती माधुरी मिलींद शिंदे, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. | सहाय्यक लेखा अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे. | श्री. अविनाश रा.कुलकर्णी, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या दि.३१.०५.२०१८ रोजीच्या प्रशासकीय बदली आदेशान्वये रिक्त. |
| ३ | श्री. दिनकर लक्ष्मण कोकणे, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. | उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, आंबेगाव, जिल्हा पुणे. | श्री. मारुती आ. लोंढे यांच्या लेखा अधिकारी पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदावर. |
| ४ | श्री. संतोष धों. मडावी, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. | सहाय्यक लेखा अधिकारी, सहसंचालक आरोग्य (हिवताप, हत्तीरोग व साथीचे रोग), पुणे. | श्री. स्नेहदिप वा. हेडाउ, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या दि.३१.०५.२०१८ रोजीच्या प्रशासकीय बदली आदेशान्वये रिक्त. |

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांना संबंधित कार्यालय प्रमुखांनी बदलीच्या पदावर हजर होण्याकरिता त्वरित कार्यमुक्त करण्यात यावे.

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होताच संचालनालयास अवगत करावे. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

संबंधित अधिकाऱ्यांच्या सद्याच्या पदावरील व बदलीच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त अथवा रुजु करून घेण्यासाठी संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. अवर सचिव, वित्त विभाग (प्रशा. कोषा.३), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बाणेर रोड, पुणे.
३. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
४. संबंधित अधिकाऱ्यांच्या बदली कार्यालयाचे प्रमुख.
५. संबंधित अधिकारी.
६. निवड नस्ती प्रशा-सलेअ-राप.



Scanned by CamScanner